## अमेरिकेच्या समृद्धीमागे भारत

वृत्तसंस्था
सिलीकॉन व्हॅली, ६ जानेवारी

अमेरिका सुखसमृद्ध बनण्यामागे भारताचा मोठा वाटा असल्याचे एका अहवालातून स्पष्ट झाले आहे. अमेरिकेत संपत्ती आणि रोजगाराच्या निर्मिती भारतासोबतच चीन आणि तायवान या देशांचाही वाटा असल्याचे या अहवालात म्हटले आहे.

१९९५ ते २००५ या काळात अमेरिकेत स्थापन झालेल्या तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी कंपन्यांपैकी २५.३ टक्के कंपन्यांचे संस्थापक भारतीय आणि चिनमधील व्यवसायिकच आहेत, असे ड्युक विद्यापीठ आणि कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधकांनी तयार केलेल्या अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, अमेरिकेतील एकूण लोकसंख्येच्या केवळ ११.७ टक्के लोकसंख्या ही जन्माने विदेशी आहे, असेही अमेरिकन जनगणनेचा हवाला देत हा अहवाल सांगतो.

भारत, चीन आण तायवान यासारख्या देशांमधील व्यवसायिकांनी अमेरिकेत जे उद्योग उभारले आहेत त्यामुळे अमेरिकेतील सुमारे चाडे चार लाख लोकांना रोजगार मिळाला असून एकट्या २००५ या वर्षात या देशाला या कंपन्यांनी ५२ अब्ज डॉलर्सचे उत्पन्नही मिळवून दिले आहे.

ब्रिटन, चीन, तायवान आणि जपानच्या तुलनेत भारतीयांनी या देशात मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी कंपन्या स्थापन केल्या आहेत. या चार देशांच्या मिळून जितक्या कंपन्या अमेरिकेत आहेत त्यापेक्षा कितीतरी जास्त कंपन्या एकट्या भारतीयांच्या आहेत. या सर्व देशांनी एकूण ७३०० अशा कंपन्या स्थापन केल्या असून यात भारताचा वाटा २६ टक्के इतका असल्याचे अभ्यासात म्हटले आहे.

कॅलिफोर्नियात भारतीयांनी स्थापन केलेल्या अशा कंपन्यांचे प्रमाण ३९ टक्के आहेत. शिवाय, कॅलिफोर्निया खोऱ्यात तर भारतीयांचे साम्राज्य असल्याचे सध्याचे चित्र आहे. विदेशी भूमितून आलेल्या व्यवसायिकांनी येथे सुरू केलेल्या उपक्रमांचे प्रमाण ५२ टक्के असून यातही भारतीयांचे प्रमाण २५ टक्केपेक्षा जास्त आहे.